Review Of Research

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# "महाराष्ट्रातील नव्या बुध्दिजीवी वर्गाची भूमिका"


**प्रा. दिगंबर शिवाजी वाघमारे**
**विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर.**

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील उच्चभ्रु व शिक्षणाशी संबंधित असलेल्या जातींनी इंग्रजी शिक्षणाकडे नवी संधी म्हणून पहायला सुरूवात केली. वासाहतिक राजवटीस इंग्रजी शिक्षण घेतलेले लोक प्रशासनात सामावून घेण्यासाठी आवश्यक होते. मिशनऱ्यांनीही शैक्षणिक संस्था स्थापन करून आपले बस्तान बसावायला सुरूवात केली होती. इंग्रजी शिक्षणाच्या या प्रसारामुळे एकोणीसाव्या शतकात बुध्दिजीवी वगा्रची निर्मिती झाली. ब्राह्मण, प्रभू, पारशी इत्यादी जाती व गटांचा या वर्गात समावेश झाला होता. अर्थात उच्चशिक्षण घेतलेल्या लोकांची संख्या मर्यादितच होती. ब्राह्मणेतरांमध्येही शिक्षणाचा प्रसार थोड्या प्रमाणात का होईना होऊ लागला.[१]

## नव्या राजवटीचा परिणाम :-

इंग्रजांची राजवट सुरू झाल्यावर कायदा आणि व्यक्तिस्वातंत्र्य विज्ञान आणि यंत्रव्यवसाय यांवर आधारलेल्या प्रगमशील पाश्चात्य संस्कृतीशी आपला निकट संबंध आला. साहजिकच येथील समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांचे कमी जास्त परिणाम दिसू लागले. जन्मसिध्द, श्रेष्ठत्वाच्या व शाश्वत समाजरचनेच्या कल्पनेला हादरा बसला.



इंग्लंडमधील लोकशाहीच्या व सनदशीरपणाच्या परंपरेमुळे तेथील शासन संस्थेविषयीच्या कल्पना पुष्कळच पुढारलेल्या होत्या. त्यामुळे हिंदुस्थानच्या पिळवणुकीला फायदेशीर स्वरूप देण्याची इंग्रजांनी दक्षता घेतली. इंग्रजी विद्येचे प्रवेशव्दार जरी सर्व वर्गांना खुले होते, तरी शतकानुशतके ज्यांना विद्येची मिरास व परंपरा लाभली होती. त्या वर्गांनीच त्या सवलतीचा आधी फायदा घेतला. पेशवाईत राज्यकारभारात ब्राह्मण वर्गाचाच भरणा अधिक होता. म्हणून इंग्रजी शिक्षण घेऊन तयार झालेल्या लोकांतही त्यांचीच संख्या जास्त आढळल्यास नवल नाही. पैशाच्या कमतरतेची सबब पुढे करून सरकाने बहुजन समाजाच्या शिक्षणाची तरतूद केली नाही. म्हणून नव्या आमदानीत वरिष्ठ वर्णाच्या विद्येची मिरासदारीला जरी तत्वतः हरताळ फासला गेला तरी इंग्रजी शिक्षणाचे व आधुनिक विचारांचे लोण खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोहोचले नाही. जिल्ह्यांची मुख्य ठिकाणे व काही तालुक्यांची शहरे येथपर्यंतच त्याचा मोठ्या मिनतवारीने प्रसार झाला. इंग्रजांचे अनुकरण करणाऱ्या मुठभर सुशिक्षितांकडे खेड्यापाड्यांतील बहुजन समाज विस्मयाने, भीतीने व साशंकतेने पाहू लागला आणि सुशिक्षितांचे व अशिक्षितांचे, शहरवासीयांचे व खेडूतांचे अशी दोन जगे अगदी निराळी झाली. ब्रिटिशामुळे भारतीय समाजजीवनामध्ये खूप काही बदल घडतांना दिसतात. व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रथमच भारतीयांना प्रत्यय आला प्राचीन कही जैन, बौध्द, व इतर तत्वज्ञानातून व्यक्तिस्वातंत्र्याला महत्वाचे मानले होते. मध्ययुगीनकाहात ही व्यक्तिस्वातंत्र्याला महत्वदेणारे अनेक संप्रदाय उदयास आले होते. परंतु प्रचलित समाजव्यवस्थेत पडला त्याचा विसर पडल्याचे दिसून येते. नवीन मुल्यांवर आधारित अनेक विचार भारतात आल्याने नव्या बुध्दिजीवी वर्गाचा उदया झाला. वासाहतवादाची गरज म्हणून जरी ब्रिटिशांनी आधुनिक शिक्षणाची सुरूवात केली असली तरी यातून उदयास आलेल्या बुध्दिजीवी वर्गांना भारतीय समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवण्याच्या व धार्मिक पुनरूज्जीवनाच्या बाजूने उभे राहणे पसंद केले.

## नव्या बुध्दिजीवींचा उदय :-

ब्रिटिशांनी प्रशासनासाठी आवश्यक असणारा वर्ग निर्माण करण्यासाठी केलेल्या शिक्षणप्रसारामुळेच बुध्दिजीवी वर्ग निर्माण होतो. ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणात कारभार-यंत्रणेची गरज हा प्रमुख हेतू होता. नोकरशाहित भारतीयांची भरती करणे आवश्यक होते आणि मेकॉलेच्या सुप्रसिध्द १८५२ च्या शिक्षणावरील टिपणात जे वर्तणूक व नीतीमत्ता यामध्ये इंग्रज असतील अशा भारतीय मध्यस्थांचा वर्ग तयार करण्याची हाक दिली गेली. त्यामागे मुख्यतः साम्राज्याचा कारभार चालविण्यास मदत करण्याकरिता कारकून वर्गाची गरजही होती. परिणामी जी कॉलेजे वाढविण्यात आली त्यामध्ये मोठया प्रमाणावर

परंपरागत अभिजात ज्ञान आणि कला या शिक्षणक्रमावर भर देऊन इंग्रजी नीतिमता शिकवलिी जाई. तथापि त्यात शास्त्र व तंत्रज्ञान यांचा समावेश नसे.[२] माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन, दख्खानच्या पठाराचा पहिला सत्ताधारी हा एक रूढीप्रिय इंग्रज होता आणि तो आमूलाग्र सुधारणा आणि जनतेची शक्ती यांना भीत असे त्याची भूमिका परंपरा न मोडता संस्थात बदल घडविणे आणि हे कार्य परंपरागत उच्चवर्गीय आणि त्यांच्या संस्था यांचे मार्फत करविणे अशी होती. त्यानुसार त्याने दक्षिणा पध्दती चालू ठेवली या पध्दतीनुसार व वेदाध्यायन करण्यामध्ये जे नैपुण्य मिळवीत, अशा ब्राह्मणांना सरकार अनुदान देत असे. त्याने पुण्यात मुंबईच्या बाहेरचे पहिले कॉलेज जे हिंदू कॉलेज काढले ते प्रथम ब्राह्मणांना अभिजात संस्कृत ग्रंथांचे शिक्षण देण्याकरिता आणि त्यातील विद्यार्थ्यांना हळूहळू पाश्चिमात्यशास्त्र व तत्वज्ञान शिकविण्याकरिता स्थापन केले होते. नंतर आलेल्या उदरमतवादी ब्राह्मणांच्या आव्हानांच्या दबावामुळे आणि ब्रिटिशांच्या हिताचा विचार करून या संस्थेमध्ये हळूहळू बदल घडवून आणले गेले. १८५९ मध्ये दक्षिण फंड सर्वसाधारण शिष्यवृत्यांसाठी वापरण्याकरिता रूपांतरित करण्यात आला. १९५० मध्ये वर उलेखिलेले कॉलेज सर्व जातींना खुले करण्यात येऊन इंग्रजी भाषा व शास्त्र यांच्या शिक्षणक्रमांना वरच्या दर्जाचे महत्व देण्यात आले आणि १८६४ मध्ये त्याचे नाव डेक्कन कॉलेज असे ठेवण्यात आले.[३]

ब्रिटिशांना अनुरूप मध्यमवर्ग महाराष्ट्रात उदयास आलेला बुध्दिजवी हा जशी वासाहतिक प्रशासनाची गरज म्हणून जसा उदयास आला तसाच तो पाश्चात्यांच्या समाजव्यवस्थेच्या धर्तीवर उदयास येतो. महाराष्ट्रातील उच्चभ्रू जातीच प्रथम शिक्षण घेवून निर्माण झालेल्या संधी मिळवताना दिसतात. नव्या बुध्दिजीवी वर्गाच्या उदयाच्या अनुषंगाने आणखी काही संदर्भात सांगता येतील. ब्रिटिशांचा व्यापारवादी, मुक्तव्यापारावादी धोरणातून निर्माण झालेल्या अर्थरचनेची व प्रशासकीय यंत्रणेची गरज भागविण्यासाठी महाराष्ट्रात नवा बुध्दिजीवी वर्ग उदयाला येऊ लागला. मुंबईतील अर्थिक उलाढालीमुळे आघाडीवर असलेले इंग्रजी जाणणारे व्यापारी लोक त्यांना मदतकारी ठरणारे इंग्रजी शिक्षित बुध्दिजीवी जातीतील लोक, प्रशासनव्यवस्था, न्यायव्यवस्था आणि शिक्षणव्यवस्था यामध्ये कार्यरत असलेले उच्चभू जातीतील इंग्रजी शिक्षित लोक हे बुध्दिजीवी वर्गाचा भाग बनत होते. त्यामुळे महाराष्ट्रातील नव्या बुध्दिजीवी वर्गाला प्रायः इंग्रजीशिक्षित बुध्दिजीवीवर्ग असे स्वरूप प्राप्त होत गेले.[४] महाराष्ट्रात ब्रिटिश सरकारने मिशनऱ्यांनी इंग्रजी शिक्षणचे धोरण स्वीकारले इंग्रजी शिक्षणाने व संस्काराने मनुष्याच्या जीवनसरणीत अमूलाग्र बदल घडवून व्यक्तिवादी समाज निर्माण करता येईल या विश्वासातून शिक्षणप्रसाराचा मार्ग अनुसरला. कराकुनांचा वर्ग तयार करण्यासाठी ब्रिटिश सरकारने तर भारतीय समाजातील पाखंडी धर्मश्रध्दांचा अंधार दूर करून ख्रिस्ती धर्मज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी मिशनऱ्यांनी शाळा काढण्यास सुरूवात केली. व्यक्तिवादी समाजनिर्माण करण्याचे ध्येय दोघांनाही समान असल्यामुळे त्यांनी पाश्चात्य इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण स्वीकारले.[५] महाराष्ट्रातील परंपरागत बुध्दिजीवी हा ब्राह्मण कायस्थ व मराठा जातीतील श्रेष्ठींचा बनला होता. यामध्ये प्राधान्याने ब्राह्मण जाती याच बुध्दिजीवी म्हणून कार्य करीत होत्या. या ब्राह्मण जातींचे कार्य ग्रामचीने सांगितलेल्या पारंपारिक बुध्दिजीवी वर्गाच्या कार्याशी जुळवताना दिसते. ग्रामचींच्या मते, इतिहासाच्या विकासक्रमामध्ये सातत्य टिकवून धरणारा धर्मोपदेशकांचा वर्ग पारंपारिक बुध्दिजीवी वर्गाचा एक भाग असतो तो धार्मिक विचार शाळा, शिक्षण, नैतिकता, न्याय, परोपकार आणि विधायक कार्य इतयादी कार्याची मक्तेदारी स्वतःकडे राखून सरंजामी उमरावशाहीचे हितसंबंध दृठ करण्याची जबाबदारी पार पाडत असतो.

## बुध्दिजीवी वर्गाचा मर्यादीत समाज परिवर्तनाची भूमीका :-

भारतात पुरोहितांच्या जातिसमूहाने म्हणजे ब्राह्मण जातींनी पारंपारिक बुध्दिजीवी म्हणून कार्य केले. भारतीय इतिहासक्रमामध्ये ब्राह्मण जाती याच बुध्दिजीवी जाती म्हणून कार्यरत राहिल्या धर्मतत्वज्ञानाची मांडणी करून कर्मकांडाचे पौरोहित्य करून जातिप्रधान नीती व विषम कायद्यांची धर्मशास्त्रे उभारून ब्राह्मण जातींनी पितृसत्ताक वर्णव्यवस्थेची उतरंड टिकवून धरली.[६] वसाहतवादाच्या आगमनानंतर समाजव्यसस्थेला नवे वळण मिळून वर्गीय सामाजिक चलनवलनाला सुरवात झाल्यावर ब्राह्मण जातीतून आलेल्या या नव्या बुध्दिजीवींच्या जबाबदारीचे स्वरून काहीसे बदलले. ब्राह्मण जातींची परंपरागत जबाबदारी पार पाडताना त्यांना पारंपारिक वर्णजातिव्यवस्थेची बूज राखावी लागत होती. आणि त्याचवेळी नव्या वर्गीय मांडवली समाजाचे बुध्दिजीवी बनण्याची अशक्यप्राय कसरत करावी लागत होती. वर्णजातिसंस्थेचे संवर्धन करण्याच्या पारंपारिक जबाबदारीमुळे व ब्राह्मणी वर्चस्व टिकवण्याच्या हव्यासामधून वर्गीय मांडवली समाजाचे बुध्दिजीवी बनण्याच्या जबाबदारीला त्यांना न्याय देता आला नाही. औद्योगिक भांडवलशाहीच्या पोषणासाठी ब्राह्मणी व्यवस्थेतील काही मुल्यांची किंमत मोजण्याला ते तयार नव्हते. परिणामी वर्गीय भांडवली समाज व संस्कृतीची उभारणी करण्याच्या जबाबदारीची त्यांनी हेळसांड केली. मात्र या नव्या सामाजिक संदर्भामध्ये जातिबांधिलकीच्या भावनेने ब्राह्मणजातीच्या हितसंबंधाची काळजी वाहण्यात ते तत्पर राहिले.[७] पाश्चात्याप्रमाणे भारतीय बुध्दिजीवी वर्गाला जुनी मुल्य सोडून नवी मुल्य पुर्णपणे स्वीकारता आली नाहीत. प्रचलित धर्मश्रध्दा नाकारण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये निर्माण झाले नाही. नवे जग त्यांना माहित होवूनही भारतीय समाजव्यवस्थेतील वर्गजातिव्यवस्थेलून निर्माण होणारे प्रभूत्व ते त्यागू इच्छित नव्हते. जातिभेद त्यांना मान्य नव्हता परंतु जातिनिर्मूलन व्हावे असे त्यांना वाटत नव्हते. भारताच्या प्राचीन काळात निर्माण झालेली वर्णजातीव्यवस्था ईश्वरनिर्मित आहे आशी त्यांची धारणा असल्याने, ती नष्ट करण्याची भूमिका त्यांना घ्यावीशी वाटली नाही.

महाराष्ट्रामध्ये उदयास आलेल्या बुध्दिजीवीवर्गाने आधुनिकतेचा स्वीकार करून धर्मचिंतनास सुरवात केली. त्यातून धर्मचिकित्सा करण्याचीही त्यांची भूमिका राहिती. रूढीग्रस्त समाजातील अमानवी जातिभेद संपले पाहिजेत असे काही नवशिक्षितांना वाटत होते. इंग्रजी राजवटीचा परिणाम म्हणून ते आत्मटिकेस तयार झाले. इंग्रजी राजवट भारतात आली, ती अनेक महत्वाच्या गोष्टी सोबत घेऊन आली. प्रबोधन

युगाचा वारसा तिने सोबत आणला होता. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत एक प्रकारची वैचारिक सांस्कृतिक जाग आणि नव्या दिशांचा शोध घेण्याची प्रवृत्ती हा त्या वारशाचा मध्यवर्ती भाग होता. इंग्रजी विद्येच्या प्रसारातून अनेक नव्या विचारप्रवाहांचा परिचय उच्च विद्याविभूषित भारतीयांना घडला. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारातून तयांना ख्रिस्ती धर्मातील समता, शांतता व प्रेम या तत्वांची ओळख झाली. या धर्माच्या शिकववणुकीने अनेकांना आकर्षित केले. आपल्याकडच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनात तसेच कला, साहित्याच्या क्षेत्रातही बोकाळलेल्या अपप्रवृत्ती, निष्क्रिय अनुत्पादकता व गतानुगतित्व पश्चिमेच्या तुलनेत त्यांना अधिकच प्रत्ययकारी झले. उपयुक्ततावादाच्या तत्वज्ञानाचा भारतीयांच्या विचारप्रध्दतीवर बराच प्रभाव पडला. उदारमतवादी लोकशाहीच्या सिध्दांत आणि व्यवहाराविषयीचे त्यांचे ज्ञान अधिकच प्रगल्भ झाले. आपल्या समाजाची व राजकारणाची उभारणी या उदारमतवादी तत्वांवर व्हावी, अशी अभिलाषा त्यांच्या मनात निर्माण झाली.[८]
वर्णजातिव्यवस्थेच्याविषयी चर्चा होण्यात ख्रिश्चन धर्मप्रसारकांचा उपयुक्ततावाद्यांचा महत्वाचा वाटा राहिला. ख्रिश्चन धर्मप्रसारासाठी हिंदुधर्मातील अनिष्ठ प्रथा परंपरावर, कर्मकांडग्रस्ततेवर ते सडकून टिका करतात. त्यांच्या निरीक्षणातून व संशांधनातून जातिव्यवस्थेचे अर्थिक शोषण व अमानवीय रूप उघड होते. यामुळे १९ व्या व २० व्या शतकात जातिव्यवस्थेच्या बाजूने व विरोधात भूमिका घेऊन जातिसंघर्षाचे लढे उभे राहतात. त्याप्रमाणे जातिअंताचे मार्ग ही शोधले जातात. जातिभेद विरहीत समाज निर्माण करण्याची धडपड होताना दिसते.

**संदर्भग्रंथ :-**

१) व्होरा राजेंद्र (संपादक) आधुनिकता आणि परंपरा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र प्रस्तावना राजेंद्र व्होरा, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००० पृ.१०
२) ऑमव्हेट गेल, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, पृ. ३७
३) तत्रैव पृ. ३८
४) बगाळै उमेश, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजातिप्रभुत्व, सुगावा प्रकाशन, पुणे - २००६. पृ. २०
५) तत्रैव पृ. ९०
६) तत्रैव पृ. ९१
७) तत्रैव पृ. ९२
८) भोळे भास्कर लक्ष्मण, विसावे शतक आणि भारतातील समताविचार, सुगावा प्रकाशन पणे - २००४, पृ. ११